Poornam Eco Vision

# पूर्णमिदं

जुलै-ऑगस्ट २०२१ | Vol 4






# संपादकीय

१५ ऑगस्ट २०२१ ला आपण ७५ व्या भारतीय स्वातंत्र्यदिनाला पदार्पण करत आहोत आणि 'पूर्णमिदं' च्या माध्यमातून आम्ही आपल्यापर्यंत पोहचत आहोत. पर्यावरण दृष्ट्या गेले दोन महिने आत्यंतिक घडामोडीचे गेले, ज्यात अतिवृष्टीमुळे महाराष्ट्रात झालेली पूर परिस्थिती असेल, अथवा विविध ठिकाणी कोसळलेल्या दरडी असतील, आणि मानवाच्या हस्तक्षेपामुळे निर्माण झालेल्या विपरीत परिस्थिती असेल या सगळ्याला आपण सामोरे गेलो. तापमान वाढ, हवामान बदल आता आपल्या सर्वांच्या प्राणांवर बेततील अशा परिस्थितीत जाणवू लागले आहेत. सर्व प्रकारच्या हव्यासापोटी, मानवाने निसर्गावर अतिक्रमण केले ज्यामुळे अनेक परिणाम आताच्या आणि पुढील पिढीला भोगावे लागत आहेत, आणि यापुढेही अधिक तीव्रतेने सहन करण्याची तयारी आता मानवाने ठेवावी अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे जी संकटे आली, त्याचा सामना आणि या संकटात असलेल्यांना तातडीची मदत सर्वानी आपापल्या पद्धतीने केलीच आहे परंतु ही खूप वरवरची मलमपट्टी आहे. खूप विचार करून मूलगामी बदल आपल्याला करावे लागणार आहेत ज्यामुळे निसर्ग संगोपन आणि संवर्धन चांगल्या प्रकारे होऊ शकेल. देशी वृक्ष लागवड, डोंगर उतारावर कमीत कमी हस्तक्षेप, पावसाच्या पाण्याचे योग्य व्यवस्थापन, कचऱ्याचे योग्य निर्मूलन याकडे सातत्याने आणि गंभीरपणे बघणे आपण सुरू करायला हवे.

याची सुरुवात आपल्या घरापासून करण्यासाठी आपल्या पाण्याचे, कचऱ्याचे नियोजन आपण योग्य पद्धतीने करून आपले घर पर्यावरण पूरक घर कसे होईल यावर प्रयत्न करायला हवे आहेत. याकरिता 'पूर्णम'ने आगामी कालावधीत जास्तीत जास्त नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न करण्याचे ठरवले आहे. आपल्या घरामधील अधिक वस्तू दुरुस्त होऊन, कचरा कमी व्हावा, याकरिता एक प्रयोग 'पूर्णम' पुण्यातील सोसायट्यांमध्ये 'Repair Katta' या माध्यमातून करणार आहे. १५ ऑगस्ट रोजी महाराष्ट्रातील ६ शहरात 'इ-

कचरा आणि प्लॅस्टिक कचरा जनजागृती आणि संकलन मोहीम' स्थानिक संस्थांच्या मदतीने राबवली गेली. शनिवारी, पर्यावरण विषयातले वेबिनार असतील, किंवा ५ ते २५ ऑगस्ट दरम्यान झालेले **स्वयंसेवक जोडणी अभियान** (21 days challenge च्या माध्यमातून) असेल, पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीत सर्व भारतीयांचा सहभाग असावा असा या उपक्रमाचा उद्देश आहे. आपण सर्व जण 'पूर्णम'च्या संपर्कात राहून पर्यावरण संरक्षणाचे काम करूया, निसर्गाच्या अधिक जवळ जाऊया, आणि समस्त मानव जातीचे कल्याण करण्याचा मार्ग जगाला दाखवून देऊया जेणेकरून भारताचा स्वातंत्र्यदिन उत्तमरीत्या साजरा होईल.

**स्वातंत्र्यदिनाच्या हार्दिक शुभेच्छा !!**

**धन्यवाद**





**राजेश मणेरीकर**

We are located at :)
'Ratnaprabha Bungalow', Near Maha E-Seva Kendra, Panchali Sweet Lane, Sinhagad Road, Vadgaon BK, Pune-411041
Website: www.poornamecovision.org,
E-mail: contact@poornamecovision.org,
Contact No.: 020-29521862

# Bimonthly Report

May- June 2021

## E-waste and Plastic Waste Management

Total Society Drives: 9

Community Drives: 5

Pocket Drives across Pune City: 7

Number of Donors: 202

Ongoing weekly E-waste Collection Centers: 9

E-waste Collection: 1460 Kg.

Plastic Waste Collection: 524 Kg.

Donated Devices: 5 Computer Sets

Donated to: Santulan at Kharadi & Aajol at Vadgaon Budruk

## Volunteering Engagement

Number of activities conducted: 3

Activities:

1. Samupadeshan: Counseling of Covid Patient

2. Plasttic Waste Awareness Campaign

Participated Volunteers: 68

Total No of Volunteers: 250+ Volunteering Engagement

## Fabric Up-cycling

Number of promotional stalls: 2 at Dhayari and Navashya Maruti (Sinhagad Road

Women Employed: 5

Mask Production: 1000

Jeans: 133 nos.

## Green Consultancy

Number of Running Composting Units: At Laxmi Park Society, Navi Peth, Balaji Temple

Garden Waste Composting Units: Their private parks and Pune Cantonment Board

Number of Running Rain Water Harvesting Units: At Laxmi Park Society (Navi Peth) & Bhushan Apartment (Karvenagar)

Number of Running Biogas Units: Balaji Temple (Pashan)

## Awareness Activities

Webinars Conducted: 9

Total Viewers: 90

## EVENTS

### Eco-exist Ganesh Idol Sale

### Eco-friendly Ganpati Festival Competition For Society and Household level

Registration till 9th September; Competition begins from 10th Sept. to 19th Sept. 2021

### E-waste & plastic collection drive out of Pune

in Solapur, Indapur, Pandharpur, Baramati and Phaltan on 2nd Oct. 2021

# घेऊ पर्यावरणाचा ध्यास, धरू पूर्णम ची कास

कुठलीही संकल्पना राबवायची म्हटली तर त्याकरिता केवळ आर्थिक पाठबळ असून चालत नाही, तर त्याचबरोबर मनुष्यबळ, अनुभवी व्यक्ती आणि स्वयंसेवक हेही तितकेच महत्वाचे ठरतात. आपल्या 'पूर्णम इकोव्हिजन' संस्थेतर्फे समाजातील वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळे उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात.

या उपक्रमांद्वारे सामाजिक जागृती व पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्याच्या दृष्टीने सातत्याने युद्ध पातळीवर काम केले जात आहे. अर्थात उपक्रम यशस्वी करण्याकरिता मोठ्या संख्येने स्वयंसेवकांचे प्रभावी कामच 'पूर्णम' संस्थेच्या यशोगाथेत मोलाचा हातभार लावत असते. मात्र 'पूर्णम'चा वाढता व्याप लक्षात घेता सध्या असलेले स्वयंसेवक हे कमी पडत आहेत. याकरिता 'पूर्णम' संस्थेने अनुभवी, स्वयंस्फूर्तीने काम करणारे, सामाजिक बांधिलकी जपणारे त्याचप्रमाणे ज्यांना काम करायची इच्छा आहे परंतु योग्य संधी व व्यासपीठ उपलब्ध नाही अशा समाजातील विविध घटकांना स्वयंसेवक म्हणून एकत्र आणण्याचे धोरण निश्चित केले आहे. याचाच एक भाग म्हणून ज्या व्यक्तींस 'पूर्णम'च्या विविध उपक्रमात स्वयंसेवक म्हणून भाग घ्यायचा असेल त्यांच्यासाठी ही सुवर्णसंधी 'पूर्णम' उपलब्ध करून देत आहे.

**'पूर्णम इकोव्हिजन' ही संस्था गेली १० वर्षे विविध पर्यावरण संवर्धनाचे उपक्रम अनेक संस्थाच्या मदतीने प्रभावीपणे राबवत आहे. उदा.**

*** इ. कचरा व प्लॅस्टिक संकलन आणि व्यवस्थापन,**

*** ग्रीन कन्सल्टंसी,**

*** जुने कपडे संकलन व पुर्नवापर प्रक्रिया ,**

*** सॅनिटरी नॅपकीन संकलन व विल्हेवाट प्रकल्प**

*** पर्यावरण विषयक जनजागृती**

या सर्व उपक्रमात 'पूर्णम'ला आपल्यासारख्या स्वयंसेवकांची गरज आहे, जे सर्व उपक्रमांमध्ये संकलन केंद्र स्वेच्छेने चालवतील, सोसायटी तसेच अन्य ठिकाणी संकलन ड्राइव्हच्यावेळी मदत करतील, विविध शाळा-कॉलेज, कंपन्या इ. ठिकाणी जाऊन जनजागृती करतील. तसेच सध्या लॉकडाऊनच्या काळात उत्तम लेखन करणारे, ग्राफिक डिझायनर अथवा सोशल मीडियावर काम करणारे, विविध पिशव्या, कपडे यांच्यावर डिझाईन किंवा प्रॉडक्ट डिझाईन करणारे या व अशा विविध कला गुणांनी समृध्द स्वयंसेवक 'पूर्णम' करिता अप्रत्यक्षपणे घरून देखील काम करू शकतात. आता पर्यंत पुणे शहरातून तसेच महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून २०० स्वयंसेवक 'पूर्णम' सोबत जोडले गेले आहेत.

गेली १० वर्षे सातत्याने या सर्व स्वयंसेवकांच्या मदतीने विविध उपक्रम हातात घेऊन ते यशस्वीपणे राबविल्याबद्दल वेळोवेळी शासनातर्फे तसेच अनेक सामाजिक संस्थांतर्फे विविध पुरस्कार देऊन 'पूर्णम' संस्थेला गौरविण्यात आले आहे. या मध्ये Nelda Foundation कडून Annual Recognition Certificate, "एकलहरे वसाहत" स्वच्छ वसाहत हरित वसाहत अभियान स्मृतिचिन्ह, Environment Conservation

Association आयोजित E waste Collection Mega Drive या मध्ये Best support तसेच SDG cart innovation याचे सहभाग प्रमाणपत्र या व अशा अनेक पुरस्कारांचा समावेश होतो. त्यामुळे नेहमीच 'पूर्णम'चे पाऊल प्रगती पथावर असते. पुरस्कार मिळवणे हा एकमेव उद्देश न ठेवता 'पूर्णम' धडाक्याने पर्यावरणाचा ऱ्हास थांबविण्यासाठी अथक प्रयत्न करत असते. त्यामुळे पुरस्कार हे आपोआपच 'पूर्णम'च्या यशात भर घालत असतात, या सर्वांच्यामागे स्वयंसेवक ही एकमेव शक्ती कार्यरत असून 'पूर्णम' नेहमीच स्वयंसेवकांना आपले बलस्थानी मानते म्हणूनच आपणांस आमच्या अनेक ठिकाणी चालू असलेल्या प्रकल्पांत सहभागी होण्याची संधी देऊ इच्छिते.

सदर प्रकल्पांची व्यवस्थित माहिती घेऊन त्यामध्ये आपण आपला सहभाग कशा प्रकारे देऊ शकाल याबाबत आमच्याशी जरूर संपर्क साधावा.

चला सर्वांनी मिळून 'पूर्णम'च्या या पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन चळवळीमध्ये सहभागी होऊन आपला खारीचा वाटा उचलुया.





**मन:श्री बापट**




Eco-exist website:
https://www.e-coexist.com

For more information Please contact

| No. | Name | Mobile No. | Area |
|---|---|---|---|
| 1 | Mr. Amol Dhumal | 9622616660 | Aundh-Baner-Pashan-Vidyapeeth |
| 2 | Mrs. Swati Rajguru | 9371589097 | Shivajinagar-Bopodi-Khadaki |
| 3 | Mrs. Uma Kalambkar | 9881736101 | Peth Area |
| 4 | Mrs. Latatai Hiremath | 9881120441 | Nagar Road |
| 5 | Mrs. Radhika Gokhale | 9370028103 | Sinhagad Road |
| 6 | Mr. Sudhir Barve | 9423174080 | Satara Road |
| 7 | Mrs. Neha Garde | 9823412224 | Kondhwa-Katraj-Ambegaon |
| 8 | Mrs. Sarala Gandhi | 9970915281 | Solapur Road |
| 9 | Mr. Manohar Havale | 9657902842 | Paud Road-Karve Road |

Scan QR code for Registration

# Photo Gallery



Nirmalya Agarbatti and Fabric Product Stall near Navashya Maruti



Commercial E-waste collection drive




Computer sets donated

Webinars conducted












# OUR PRODUCTS